माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

रामाआ-तक्रार क्र.बीएम-७४६ ते ७५०/२०२४ (एकूण-५)

अपिलार्थी श्री. प्रमोद भैरवनाथ घोडके

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (शहर)
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, कार्यकारी अभियंता (शहर) यांचे कार्यालय,
रुम नं.५३९, ४ था मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

द्वितीय अपील आदेश दिनांक	तक्रार दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याकडून मागविण्यात आलेल्या अहवाल पत्र दिनांक	जन माहिती अधिकाऱ्यांचा अहवाल दिनांक
१९.०९.२०२४	२१.१०.२०२४	०६.०८.२०२६	२०.०८.२०२६

तक्रारकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये आयोगाकडे दि. २१.१०.२०२४ रोजी ०५ स्वतंत्र तक्रार अर्ज दाखल केली आहेत.

२. सदर तक्रार अर्जात त्यांनी असा उल्लेख केला आहे की, सदर तक्रार अर्जान्वये त्यांनी खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

१. वारंवार व्यक्तीश: केलेल्या पाठपुराव्यानंतरही आजमितीस कलम १९ (३) अंतर्गतच्या द्वितीय अपील सुनावणी आदेशान्वयेची कारवाई निरंक संगनमताने द्वितीय सुनावणी आदेशांचे अनुपालन करणेस टाळाटाळ,

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ तरतुदींतील कलम २०(१) तसेच कलम २० (२) नुसार संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी नम्र विनंती तसेच कलम १९ (८) (ख) नुसार नुकसान भरपाई देण्यात यावी,

३. अधिनियमांतील तरतुदींन्वये कारवाई करुन माहिती देणेत यावी,

३. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ (शहर) यांच्याकडून दि.०६.०८.२०२६ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला होता. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ व २ अभियंता / शहर, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी आयोगास दि.२०.०८.२०२६ च्या पत्रान्वये ५ तक्रारींच्या अनुषंगाने एकत्रितरित्या अहवाल सादर केला असून त्याद्वारे त्यांनी असे नमूद केले आहे की, आयोगाचे दि.०६.०८.२०२६ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून सदर पत्र प्राप्त झालेनंतर श्री. प्रमोद भैरवनाथ घोडके यांना या कार्यालयात बोलावून संपूर्ण माहिती त्यांना म्हाडाच्या संकेतस्थळावर दाखविण्यात आली तसेच सदरची माहिती त्यांना pendrive मध्ये देण्यात आली आहे. सदर माहितीवरुन त्यांचे समाधान झाले व आता

..२/-

त्यांना कोणतीही तक्रार नाही असे दि.१६.०८.२०२६ च्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. सदरचे पत्र आपल्या माहितीसाठी या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे. सदरच्या पत्रान्वये श्री. प्रमोद भैरवनाथ घोडके यांनी त्यांचे सर्व तक्रार अर्ज निकाली काढणेबाबत विनंती केली आहे.

तक्रारकर्ता श्री. घोडके यांच्या दि.१६.०८.२०२६ च्या पत्रात असे नमूद केले आहे की, "सदर प्रकरणात विद्यमान अधिकारी यांनी मला कार्यालयात बोलावून माहितीबाबतचे निरीक्षण करण्याची संधी देऊन सदरची माहिती संकेतस्थळावर अपलोड केल्याचे दाखविले तसेच जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नव्हती ती मला संबंधितांनी आज दि.१६.०८.२०२६ रोजी pendrive मध्ये दिलेली असल्याबाबतची नोंद कृपया आपण सदर पत्रान्वये घ्यावी"

४. सदर तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास दि.१६.०८.२०२६ रोजी pendrive मध्ये माहिती दिली असून त्यांची पोच म्हणून सदर पत्राची प्रत आयोगास सादर केली आहे. त्यामूळे सदर प्रकरणात माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १८(२) अन्वये अधिक/ सखोल चौकशी करण्याची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढून आयोग पुढील आदेश देत आहे :

आदेश

उपरोक्त विवेचनासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

12-10-2026

मुंबई
दिनांक : १२.१०.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई